महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका
रविराज क्रु मॉल इमारत, बिबवेवाडी कोंढवा रोड, बिबवेवाडी, पुणे ३७
Email - asakpal@punecorporation.org
दुरध्वनी क्र. – 020-25506958
जा.क्र.:शामस/९४ दि.–२६/०८/२०१७

## अपिलाची सुनावणी

अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्या प्राधिकरणासमोरील कामकाज.

दिनांक – १०/०८/२०१७ दिनांक – सकाळी ११.०० वा.

स्थळ – महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका, रविराज क्रु मॉल इमारत, बिबवेवाडी कोंढवा रोड, बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

प्रति,
**श्री. दिनेश खराडे**
सोनाई, घर क्र.४६४, चाळ क्र.५९,
महर्षिनगर, पुणे ४११०३७. } **अपिलार्थी**

**श्री.मु.म.शेख**
महापालिका सहाय्यक आयुक्त
बिबवेवाडी कार्यालय,
पुणे महानगरपालिका. } **जनमाहिती अधिकारी तथा** उप अभियंता

**माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल**

श्री.दिनेश खराडे (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांचा माहिती अधिकारातील दिनांक ०२/०६/२०१७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधिले जातील) यांना दिनांक ०२/०६/२०१७ रोजी प्राप्त झाला. सदर अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी कनिष्ठ अभियंता श्री.निवदेकर यांचे सहिने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत, व्यक्तीगत शौचालय बांधणे कामांचे बिलांची माहिती विचारलेली होती.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जाचा दिनांक | अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | माहिती द्यावयाचा अंतिम दिनांक | अर्जदारास माहिती पाठविल्याचा दिनांक | विलंब दिवस |
| ०२/०६/२०१७ | ०२/०६/२०१७ | ०१/०७/२०१७ | १६/०६/२०१७ | - |

अपिलार्थी यांनी विचारलेली माहितीपैकी मुद्दा क्र.२ ची माहिती न मिळाल्याने त्यांचा अपिल अर्ज दिनांक १७/०७/२०१७ रोजी अपिल अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झाला.

| अपिल अर्जाचा तपशील | | |
|---|---|---|
| अपिल अर्जाचा दिनांक | अपिल अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | अपिल दाखल करावयाचा अंतिम दिनांक |
| १७/०७/२०१७ | १७/०७/२०१७ | अपिल अर्ज मुदतीत आहे. |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ – दि.०५/०८/२०१७ रोजी सकाळी ११.०० वा.
प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ – दि.१०/०८/२०१७ रोजी सकाळी ११.०० वा.
सुनावणीस अपिलकर्ता – अनुपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी व सहा. जनमाहिती अधिकारी – उपस्थित

**जनमाहिती अधिकाऱ्याने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराचा/माहितीचा तपशील –**

| माहितीचे वर्णन | तपशील |
|---|---|
| १) श्री निवदेकर यांचे सहीने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत व्यक्तीगत शौचालय बांधणे कामाचे बिलांची झेरॉक्स प्रत मिळावी. | अपिलकर्त्याने कागदपत्रांची पाहणी केल्यानंतर आवश्यक माहितीकरिताचे शुल्काचे चलन मनपा कोषागरात भरल्यानंतर अपिलकर्त्यास माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. |

| | |
|---|---|
| २) लाभधारकांनी दिलेल्या कागदपत्रांची झेरॉक्स प्रत मिळावी | सदर माहिती ही तिराहीत पक्षाची व व्यक्तीगत स्वरूपाची माहिती असल्या कारणाने उपलब्ध करून देणेत आलेली नाही. |
| ३) लाभधारकांची यादी, नाव,पत्ता, संपर्क क्र. याची एक्सेल शीट ची प्रत मिळावी | अपिलकर्त्यांने कागदपत्रांची पाहणी केल्यानंतर आवश्यक माहितीकरिताचे शुल्काचे चलन मनपा कोषागरात भरल्यानंतर अपिलकर्त्यास माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. |

अपिलार्थी यांचे वरील अपिल अर्जावर दिनांक ०५/०८/२०१७ रोजी दुपारी ११.०० वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी श्री.दिनेश खराडे यांनी सुनावणीस उपस्थित राहता येणार नसल्याचे दुरध्वीनवरून उपअधिक्षक श्री.वाळके यांना कळविल्याने अपिलार्थीस त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी मिळावी म्हणून दिनांक १०/०८/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन:श्च सुनावणी आयोजित करणेत आलेली होती. परंतु सदर सुनावणीस ही अपिलार्थी श्री.दिनेश खराडे हे अनुपस्थित होते.

सदर दिनांकास श्री.मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. सहाय्यक जनमाहिती अधिकार तथा कनिष्ठ अभियंता श्री.शशिकांत निवदेकर व या कार्यालयाकडील उप अधिक्षक श्री.सुरेंद्र वाळके हे उपस्थित होते.

अपिलार्थी श्री.दिनेश खराडे यांनी मुद्दा क्र.२ ची माहिती दिली नाही त्यामुळे प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

वरीलप्रमाणे जनमाहिती अधिकारी व सहाय्यक जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यानुसार मी, अपिलीय अधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका प्रस्तुत प्रकरणी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

**अपिल अधिकारी यांनी सदर सुनावणीमध्ये केलेले 'आदेश'**

➢ जनमाहिती अधिकारी यांनी जावक क्र.शामअ/५९ दि.०३/०७/२०१७ रोजीचे पत्रात नमूद केलेले उत्तर योग्य असलेने सदर अर्जाचे उत्तर कायम करणेत येत आहे. प्रकरण निकाली काढणेत येत आहे.

कळावे,

16/08/17

(अविनाश सकपाळ)
**अपिलीय अधिकारी** तथा
**महापालिका सहाय्यक आयुक्त**
बिबवेवाडी कार्यालय
पुणे महानगरपालिका.

टिप –

१. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या आत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे – ४११००१ यांचेकड व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतूद आहे.
२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत –

१. श्री.दिनेश खराडे, सोनाई, घर क्र.४६४, चाळ क्र.५९, महर्षिनगर, पुणे ४११०३७.
२. श्री.मु.म.शेख जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, महापालिका सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी कार्यालय, पुणे महानगरपालिका.